**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

## प्रेस नोट

दिनांक 16/10/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

### दहेगाव रंगारी येथील हॉटेल एम्पायर ग्रील फॅमिली रेस्टोरेन्ट येथे सुरू अललेल्या हुक्का पार्लरवर धाड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 15/10/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात आरोपी शोध बाबत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली की, पो.स्टे. खापरखेडा अंतर्गत सावनेर–नागपूर महामार्गावरील Empire Grill Family Restaurant येथे अवैद्यरित्या हुक्का पार्लर सुरू आहे. अशी माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने नमूद ठिकाणी कार्यवाही केली असता तेथे विदेशी दारू, बीयर व हुक्क्याचे साहित्य ज्यामध्ये हुक्का पॉट, हुक्का चीलम, पाईप, ईत्यादी व वेगवेगळ्या 3 प्रकारचे प्रतिबंधित सुगंधित तंबाखू असा एकुण 12,100/–रु. चा मुद्देमाल मिळून आला. पोलीस स्टेशन खापरखेडा येथे हॉटेल मालक विरूध्द 65(ई),83,84 मदाका सह कलम 4,21 सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादन अधिनियम 2003 सह कलम 33/131 महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. संपूर्ण मुद्देमाल व गुन्ह्याची कागदपत्रे व दोन आरोपी नामे– 1) स्नेहल संजय रामटेके वय 28 वर्ष, रा. प्लॉट नं 53 आर बी आय कॉलोनी फ्रेन्डस कॉलोनी नागपुर व 2) शक्तीकुमार फुलेलचंद शर्मा वय 35 वर्ष, रा. भुतासा पो स्ट सेरी ता बजरवहा जि. डोडा जम्मु काश्मीर ह. मु. एम्पायर रेस्टॉरन्ट खापरखेडा यांना पुढील कायदेशीर कार्यवाही कामी पोलीस स्टेशन खापरखेडा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपरपोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, पोनि श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनात स.पो.नी. श्री राजीव कर्मलवार, श्री जितेंद्र वैरागडे, श्री अनिल राऊत, पो.हवा. श्री विनोद काळे, श्री गजेंद्र चौधरी, श्री मदन आसटकर, पोना श्री अरविंद भगत, पो.शी. श्री विरेंद्र नरड, श्री अमृत किनगे, श्री विपीन गायधने, श्री अमोल वाघ, श्री रोहन डाखोरे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष